


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# कोरकू आदिवासींची लोकसंस्कृती व सण.

डॉ. प्रमोद भीमराव गारोडे
प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पद्व्युत्तर मराठी विभाग,
बी. एस. पाटील महाविद्यालय,
परतवाडा, जि. अमरावती

सदस्य - अण्णा भाऊ साठे चरित्र साधन प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई
माजी सदस्य - मराठी अभ्यास मंडळ, संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
माजी सदस्य - भाषा अभ्यास मंडळ, संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
माजी सदस्य - राज्य मराठी अभ्यास मंडळ, बालभारती, शालेय शिक्षण विभाग, पुणे

**प्रस्तावना -**

मेळघाटमध्ये कोणी आले किंवा नकाशावर जरी पाहिले तरी लक्षात येते की, मेळघाट हा मुळात डोंगराळ भूभाग आहे. अमरावती जिल्हयाच्या पश्चिम-उत्तरेकडे ज्या पर्वत रांगा आहेत त्या सातपुडा पर्वताच्या आहेत. या पर्वताला सातपुडा हे नाव पडायला कारण म्हणजे या पर्वताचे सात पदर किंवा घड्या आहेत. या पर्वताच्या कुशीत धारणी व चिखलदरा हे दोन तालुके वसले आहेत. या दोन तालुक्याच्या भूप्रदेशाला मेळघाट म्हटल्या जाते. मेळघाट म्हणजे अनेक घाटांचा मेळ जेथे होतो तो मेळघाट. हा संपूर्ण भूप्रदेश वनाने व्यापलेला आहे. या घाटाच्या जसे जसे आपण आत जातो तसतसा मेळघाट अतिदुर्गम होत जातो. एका घाटातून दुस-या घाटात जाताना लहान-मोठ्या द-या ओलांडाव्या लागतात. या द-याखो-याच्या भागात राहणारा आदिवासी म्हणजे कोरकू होय. या मेळघाट मध्ये मुख्यतः कोरकू आदिवासींची वस्ती आहे. ही आदिवासी जमात मुंडा वंशाची आहे. ‘‘महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच आदिवासी जमातीमध्ये असलेल्या नाविण्यपूर्ण प्रथा, परंपरा यामुळे या जमातीचे वेगळेपण नजरेत भरते. या जमाती सामाजिक, आर्थिक दृष्ट्या अत्यंत मागासलेल्या असल्या तरी सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न व समृद्ध आहेत.’’[1] या समृद्ध संस्कृतीचा अभ्यास येथे अभिप्रेत आहे. या शोधनिबंधामध्ये मेळघाटात राहणा-या कोरकू आदिवासींच्या भवई पूजा, बैल पोळा आणि होळी या लोकसंस्कृतीतील सणांच्या उत्सवाचा मागोवा घेऊन कोरकू आदिवासींच्या सण संस्कृती कशी आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न निबंधकर्त्याने केला आहे. कोरकू आदिवासींच्या सण संस्कृतीचा शोध घेतांना तेथील आदिवासींशी प्रत्यक्ष चर्चा करून हा शोधनिबंध साकार झाला आहे.

**भवई पूजा** -

भवई पूजा हा कोरकू समाजाचा पहिला सण मानल्या जातो. भवई पूजा चा मान गावातील पटेल यांचा असतो. त्याच्या हातानेच ही पूजा केली जाते. शेतात जेवढेही धान्य पिकते तेवढे थोडे थोडे गोळा करून आणि कांदे हे सर्व गोळा करून गावातील मुठवा (आदिवासींची देवता) समोर ठेवतात. नंतर ते धान्य खुबीच्या पानात लहान लहान पोटली बांधून घरोघरी देतात. ही धान्याची पोटली हातात न देता घरोघरी जाऊन घराच्या दारावर ठेवल्या जाते. नंतर ते दारावरून काढून त्याची पूजा केली जाते. शेतीकामामध्ये जेवढे अवजार वापरले जातात ते सर्व जमा करून त्याचीही पूजा केली जाते. ही पूजा करतांना एक नारळ, खारीक, लिंबू, कुंकू, हळद, अगरबत्ती, कापूर इत्यादी साहित्य वापरले जाते. अशा प्रकारे भवई पूजा केली जाते. भवई पूजेच्या पहिल्या दिवशी जे धान्य घरोघरी पोटली बांधून दिले जाते ते धान्य पेरणीच्या वेळी बियाण्यांमध्ये मिसळतात. यातून एक प्रकारे येणारे पिक हे भरघोस यावे आणि धान्याची समृद्धी निर्माण व्हावी ही भावना यात असते.

''आदिवासी लोक पावसाला देव मानतात. त्याला प्रसन्न करून घेण्यासाठी, तो पुरेसा पडावा यासाठी कोरकू, गोंड वरूण राजाची आराधना करण्याचा सण 'भवई' हा वैशाख अमावस्येला साजरा करतात. प्रथम 'रांड भावे' व पाऊस पडल्यानंतर 'चिकला भावे' असे दोन भाग पडतात. पूर्ण गाव नृत्यात भाग घेतात. लहान मुलांच्या डोक्यावर मडके देऊन त्यात पाणी, बेडूक, कडुनिंबाचे डहाळे ठेवतात. कमरेला झाडपाला बांधून गावभर नाचतात. बाया डाेक्यावर आणि मडक्यात पाणी ओततात. 'देदरा माता पाणी दे पानी दे, पानी कायोम सरोम सेरोम, देदरा माता पानी दे, पानी दे' हे गीत म्हणत सर्व गावकरी संपूर्ण गावाची फेरी पूर्ण करतात''[2]

भवई पूजेच्या दुसऱ्या दिवशी लहान मुले आणि मुली घरोघरी जाऊन धान्य मागतात. केवळ धान्यच मागत नाही तर मिठ, मिरची, तेल, कांदे इत्यादी साहित्यही मागतात. हे मागत असतांना एका मुलीच्या डोक्यावर एक छोटीशी टोपली असते. त्या टोपलीत जांभूळाच्या पानावर बेडूक ठेवल्या जाते आणि एका मुलाच्या खांद्यावर जांभूळाच्या झाडाची फांदी दिली असते. ते देदरा मातेला पाऊस पडण्याची विनंती गाण्यातून करीत असतात. हे गाणे पुढील प्रमाणे-

'देदरा माता पाणी दे पाणी दे
शेरोम शेरोम से
इटा घुडी लोखोडे माटा डाणी घामाये
देदरा माता पाणी दे पाणी दे
शेरोम शेरोम से'

अशा प्रकारे मुली गाणे गातात आणि पुढे मुले गाणी गाताना म्हणतात-

'मिचा का बान बुलुम का बान
कोबदाळेन डाका बन'

घरोघरी धान्य मागून झाल्यानंतर सर्व मुलं मुली नदीवर जातात आणि गोळा झालेल्या धान्याचा स्वयंपाक करतात. संध्याकाळी गावात परत येतांना ज्या मुलीच्या डोक्यावर टोपली असते त्या मुलीला नवरी व ज्या मुलाच्या खांद्यावर जांभुळाच्या झाडाची फांदी असते त्या मुलाला नवरदेव बनवितात. नंतर नदीतून एक गडवा पाणी आणून नवरीच्या डोक्यावर ठेवतात. नवदेवाच्या खांद्यावर सिवल जोता आणि बांबुचा लाकुड असते. नंतर ते सर्व गावात येतात. गावात आल्याबरोबर ते मुठवा देवाजवळ जातात. तिथे नारळ, खारिक, लिंबू, अगरबत्ती, कापूर इत्यादीने मुठवा देवाची पूजा करतात.पूजा करत असताना मुठवा देवा समोर एक पांढरा रंगाचा टॉवेल ठेवल्या जातो. त्या टॉवेलवर नदीवरून आणलेला पाण्याचा गडवा उलटा ठेवून पाणी ज्या दिशेने वाहणार त्या वर्षी त्या दिशेने पाऊस येईल अशी आदिवासींची भावना असते. भवई पूजा झाल्यानंतर जांभूळाच्या मांडवाखाली त्या मुला मुलीचे लग्न करून देतात. नंतर सर्वजण जेवण करून हा भवई पूजेचा उत्साह मोठ्या आनंदाने साजरा करतात. भवई पूजेच्या माध्यमातून आदिवासींच्या लाेकसंस्कृतीचे दर्शन घडते.

''आदिवासी हा निसर्गपूजक, प्रकृतीपूजक आहे.आदिवासी संस्कृती मौखिक पद्धतीने टिकून असून ती समृद्ध आणि संपन्न आहे. गेल्या हजारो वर्षांपासून एका पिढीकडून दुस-या पिढीकडे तिचे हस्तांतरण होत आले आहे. आदिवासी संस्कृती ही जीवनाचा पाया मानून श्रम, समूह आणि सहकार्य या मानवी जीवनमूल्यांच्या आधारे आपले जीवन जगत आहे. आदिवासींच्या जीवनातील प्रत्येक हालचाल, जीवनव्यवहार आजही याच मूल्यांच्या आधारे हाेतांना दिसतात. आदिवासी समाजात आज समूह जीवनाचे अनेक पैलू आहेत. हे लक्षात घेतले तर आदिवासी संस्कृती किती महान आहे याची प्रचिती येते.''[3]

**बैल पोळा -**

बैल पोळा हा आदिवासी शेतकèयांचा सर्वात मोठा सण तीन ते पाच दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी नदी वरून गोटे आणि जंगलातून कळच्या झाडाचे सालं आणल्या जाते. नदीतून आणलेल्या गोट्यांना स्वच्छ पाण्याने धुतल्या जाते. त्या गोट्यावंर हळद पिसल्या जाते. बैल राजाला सजवण्यासाठी कळच्या झाडाच्या सालाची चवर बनवतात. त्यानंतर बैल राजाला आंघोळीसाठी नदीवर घेऊन जातात. नदीच्या पाण्याने बैलांना धुतात-आंघोळ घालतात. संध्याकाळी दोन पोळींवर हळद टाकतात. पोळीला पळसाच्या पानावर ठेवून हळद आणि लोण्याने बैलाचा खांदा मालीश करून गरम पोळीने शेकतात. ती पोळी बैली राजाला खाऊ घालतात. त्याच्या सोबत त्याचे मालकालाही पोळीचा तुकडा खावा लागतो. नंतर घरच्या देवा जवळ नारळ, कुंकू, हळद, खारिक, अगरबत्ती, लिंबू आणि शेती कामासाठी वापरल्या जाणा-या अवजारांची घरी पूजा केली जाते.

बैल पोळ्याच्या दुसèया दिवशी पुरण पाेळी बनवतात. बैल राजाला खाऊ घालण्यासाठी वालाच्या शेंगासोबत खिचडी बनवतात. सकाळी बैल राजाला रंगाने व चवर बांधून सजविल्या जाते. नंतर त्याला गावा बाहेरच्या मंदिरात पुजेसाठी नेतात. मंदिरा समोर आंब्याच्या पानाचे आणि नारळाच्या दोरीचे मोठे तोरण बांधले जाते. सर्व बैलांची पूजा झाल्यानंतर सर्वांचे बैलजोडी तोरणाखाली जमा करतात. नंतर बैल

जोडीने तोरण तोडल्या जाते. तोरण तोडल्यानंतर सर्वजण घरी जातात. घरी बैलराजांचे पाय धुवून त्यांची पूजा केली जाते. बैलाला पुरणपोळी आणि खिचडीचा नैवेद्य खाऊ घालतात.

बैल पोळ्याच्या तिस-या दिवशी बैलांना शेतात घेऊन जातात. शेतात जे काही पेरले असेल ते थोडे थोडे खाण्यासाठी देतात. नंतर घरी आणून त्यांना थोडे मिठ खाऊ घालतात. नंतर घरोघरी जाऊन पुरणपोळी मागतात. प्रत्येक घरी बैलाची व सोबत असलेल्या माणसाची पूजा करून त्याला पैसे किंवा खोबरे दिले जाते. त्यानंतर गावात बळगा सोडतात. बळगा मध्ये गावातील सर्व बैल धावतात. अशा प्रकारे कोरकू आदिवासींमध्ये बैलपोळ्याचा हा तीन दिवस साजरा करतात.

चवथ्या आणि पाचव्या दिवशी पंचमी साजरी करतात. त्या दिवशी ज्याना जे खायचे आहे ते घरी बनवतात आणि गदुली हे नृत्य करतात. अशा प्रकार कोरकू आदिवासी शेतकरी पोळा हा सण साजरा करतात.

**होळी -**

आदिवासी कोरकू समाजाचा सर्वात महत्त्वाचा सण म्हणजे होळी. कोरकू आदिवासी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. गावामध्ये एक मोठी आणि एक लहान अशा दोन होळी पेटविल्या जातात. मोठी होळी ही गावाच्या आत आणि लहान होळी ही गावाच्या बाहेर पेटविल्या जाते. ‘‘होळी हा आदिवासींचा सर्वात मोठा, महत्त्वाचा आणि पवित्र सण. काही भागात उंच बांबूला तर काही भागात एरंडाच्या झाडाला तोरण, पापड्या, हारडा, वाट्या बांधून होळीच्या खांबाची विधीवत पूजा करून पूर्वापार ठिकाणी खांब उभा केला जातो... कोरकू जमातीत पुढील विधी गीत म्हणून होळी पेटविली जाते.

आओरे डायसाणी होळी रं खेळ
बारमीनान आईरं होळी.
होळी खलोरे झोकती ।।1।।
होळी खेळोरे राज जलम दिनारे
हाेळी खेळोरे झोकती।।2।।

होळी पेटविण्याच्या आधी एकमेकांना शिव्या देणे, ऐकमेकांना काठीणे मारणे, लाथा मारणे, जोरजोरात बोम्बा मारणे इत्यादींच्या आधारे उपस्थित आबालवृद्ध मनोरंजनाची कामे करीत असतात.’’[4]

**अ) मोठी होळी -**

मोठी होळी ही पहिल्या दिवशी गावात पेटविली जाते. आदिवासी कोरकू हे मोठी होळी गावात एका ठिकाणी उभी करतात. होळी उभी करण्यासाठी जांभूळाच्या फांद्या, पळसाची फुलं आणि नदी वरून पाच गोटे आणल्या जातात. त्या ठिकाणी गावातील सर्व लोक पूजा करतात. होळीच्या बाजूला एक मोठी टोपली ठेवल्या जाते. त्या टोपलीत नैवेद्य ठेवतात. होळीची पूजा घरातील कर्त्यापुरूषाच्या हातून होते. नंतर घरच्या मंदिरात पूजा केली जाते. घरच्या अंगणात होळी उभी करतात. तिथे सुद्धा जांभूळाच्या फांद्या,

बांबूचे लाकडं, ज्वारीच्या कळप आणि पाच गोटे व पळसाची फुले गाठी या सर्वांची पूजा केली जाते. नंतर नैवेद्य ठेऊन होळी पेटवितात. सर्वजण पाया लागतात तसेच एकमेकांचे पाया पडतात.

**ब) लहान होळी -**

लहान होळी ही गावाबाहेर दुसèया दिवशी पेटविली जाते. गावातील काही माणसं जंगलात जाऊन लाकडं आणतात. जंगलातील लाकडं, बांबुचे लाकडं, पळसाची फुलं आणल्या जाते. तुटलेली सुपळी, टोपली, पांढरा धागा ह्या सर्व वस्तू जमा करून होळी उभी करतात. होळीच्या मधोमध खाली एक पाळणा बांधल्या जातो. पाळणा पांढरा धागा व पांढ-या टॉवेलने बांधल्या जातो. त्या पाळण्यात गोटे ठेवतात आणि होळीच्या वर पळसाची फुलं टाकल्या जाते. तुटलेली सुपळी आणि टोपली बांधल्या जाते तसेच दुधी भोपळा व आंब्याच्या पानांचे तोरण बांधल्या जाते.

संध्याकाळी होळी पेटविण्याकरिता गावातील सर्व लोकं जमा होतात. होळी पेटविण्याकरिता गावाबाहेर जात असतांना सोबत पोळी आणि गाठी नेतात. तिथे सर्व जण गोळा झाल्यानंतर गदुली नृत्य करतात. जोपर्यंत चंद्रमा होळीच्या वर (माथ्यावर) येत नाही तोपर्यंत गदुली नृत्य सुरू असते.चंद्रमा होळीच्या वर आल्यानंतर गावच्या पटेलच्या हाताने होळीची पूजा केली जाते. सर्वजण होळी भोवती पाचवेळा फिरतात आणि मगच होळी पेटविली जाते. होळी जळत असतांना घरून आणलेली पोळी आणि गाठी आपआपल्या शरिराभोवती फिरवून ते होळीत फेकतात. जेव्हा होळीतील जळते लाकडं खाली पडतात तेव्हा मुले ते पकडतात आणि गोल फिरवितात. फिरवून झाल्यानंतर काही जण त्या आगीतून पोळी सुद्धा काढतात. सर्वांच्या हाताच्या लहान बोटाला चटके देतात. चटके देण्याचे कारण असे मानल्या जाते की, आपल्या शरीराचे रोग सर्व दूर होतात. नंतर पुन्हा एकदा गदुली नृत्य केले जाते. सर्वजण एकमेकांना गळे भेट घेतात. मोठ्यांच्या पाया पडतात आणि रंग लावतात. अशा प्रकारे कोरकू आदिवासी होळीचा दुसरा दिवस साजरा करतात.

होळीच्या तिस-या दिवशी पुन्हा होळी जिथे पेटविली तेथे गावातील माणसे जातात. तिथे जाताना ढोल आणि बासुरी वाजवत जातात. तिथून होळीची राख आणल्या जाते. येथून पुढे पाच दिवस पर्यंत रंग खेळतात आणि फगवा मागतात. आदिवासी कोरकू हा घरोघरी जाऊन फगवा मागतात. तसेच रस्त्यावर दोरी बांधून येणाèया जाणा-यांना थांबवून फगवा मागतात. ''बहुतेक सर्वच आदिवासी जमातींमध्ये मोठी होळीपासून तर रंगपंचमी पर्यंत गावोगाव फिरून फाग मागण्याची प्रथा आजही अस्तित्त्वात आहे. मुंडा, कोरकू जमातीत-

'1. समुहः बाला रांडे पूर्वी हो
सिया नीका सोताना धुनी हो
कुच्ची निहारो हिंडा
2. समुह : हिंडा खरजीयाल नया दुने
कुची निहारो

अशी गाणी म्हणत गावोगावी फाग मागत फिरत आबालवृद्ध उपस्थितांची करमणूक करत आनंद लुटत असतात.''[5] त्यानंतर पाचव्या दिवशी म्हणजे पंचमीला ज्वारीची भाकर किंवा पुरी व त्याबरोबर मटन किंवा चिकन खातात. अशा प्रकारे आदिवासी कोरकू समाजामध्ये होळी हा सण आठ दिवस साजरा करतात.

**समारोप -**

मेळघाट मधील आदिवासी कोरकू जमातीतील लोकांची संस्कृती आणि सण उत्सव फार समृद्ध आहे. आदिवासी हे निसर्ग पूजक असल्यामुळे निसर्गपूरक सण उत्सव साजरे केले जातात. या सण उत्सवातून निसर्ग पूजे बरोबरच मनोरंजन आणि आदिवासी लोकसंस्कृतीची जोपासना केली जाते. आदिवासींमध्ये समूह भावनेला फार महत्वाचे स्थान आहे. आदिवासी नृत्यापासून ते लोकसंस्कृतीतील सण उत्सवापर्यंत सर्वत्र आदिवासी समूहाने वावरतांना दिसतो. हे त्यांच्या एकतेचे प्रतिक आहे.

संदर्भ ः

1. फडकी मासिक - संपादक डॉ. संजय लोहकरे, आदिवासी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती- डॉ. मोतीराम रावजी देशमुख यांचा लेख, अंक: 15 जुलै 2024, संगमनेर, जि. अहमदनगर, पृ. 5
2. तत्रैव, पृ.10
3. तत्रैव, पृ.4
4. तत्रैव, पृ.9
5. तत्रैव, पृ.9